**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)**

माहितीचा अधिकार

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १३७९/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. राजेश नवलकिशोर ठाकूर, विशाखा निवास, अजय नगर, अंबाझरी हिल टॉप, नागपूर-३३ | ग्रामसेवक, ग्राम पंचायत, बोरखेडी(रेल्वे), ता.जि. नागपूर | विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, नागपूर |

**अंतरिम सुनावणी दिनांक :- १४.११.२०२४**
**अंतिम आदेश दिनांक :- ०९.१२.२०२५**

अपिलार्थी, श्री. राजेश नवलकिशोर ठाकूर यांनी दिनांक २३.०५.२०२२ रोजी आयोगासमोर सादर केलेल्या व्दितीय अपीलावर आयोगाने दिनांक १४.११.२०२४ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे अंतरिम आदेश पारीत केले आहे.

१) जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे), ता.जि. नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५.०३.२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहिती संदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन ५० पृष्ठापर्यंतची माहिती १५ दिवसात समक्ष/नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी. त्यापुढील माहितीची पृष्ठे विहित शुल्क आकारुन अपिलार्थीस पुरवावीत. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर अपिलार्थी यांना १५ दिवसांत पाठवावे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे), ता.जि. नागपूर यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना मिळेल याबाबतची विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

३) सदर प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्वसूचना न देता अथवा पुर्व परवानगी न घेता जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी व्दितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द

सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५) सहा, दि०१/१२/२०१५ नुसार कार्यवाही करण्याचे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी याचे कार्यालय प्रमुख यांना प्रस्तावित करण्यात येत आहे.

उपरोक्त आदेशास अनुसरुन आयोग कार्यालयातून दिनांक २६.११.२०२५ रोजी सुनावणी सूचना निर्गमित करुन संबंधितांना दिनांक ०९.१२.२०२५ रोजी स्वंयस्पष्ट खुलाशासह उपस्थित राहण्याबाबत सुचीत करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने आज दिनांक ०९.१२.२०२५ रोजी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, गट ग्रामपंचायत गोरखेडी (रेल्वे), पंचायत समिती नागपूर जि. नागपूर श्री. गणेश शंकरराव राऊत उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, गट ग्रामपंचायत गोरखेडी (रेल्वे), पंचायत समिती नागपूर जि. नागपूर श्रीम. प्रज्ञा सरोदे उपस्थित आहेत.

आयोगासमोर प्रस्तावित केलेल्या दि. ०९.१२.२०२५ रोजीच्या द्वितीय अपील सुनावणीच्यावेळी, उपलब्ध कागदपत्रावरुन तसेच प्राप्त खुलाशावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. राजेश नवलकिशोर ठाकूर यांच्या व्दितीय अपिल अर्जावर दि. १४.११.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सुनावणीनंतर दि. १३.०१.२०२५ रोजी अंतरिम आदेश निर्गमित करण्यात आला होता. या आदेशानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे), ता.जि. नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५.०३.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे, असे आदेशित करण्यात आले.

उपरोक्त अंतरिम आदेशानुसार तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे), ता.जि. नागपूर यांनी आयोगास खालीलप्रमाणे खुलासा सादर केकला आहे.

"प्रथम सुनावणीकरीता मी वैद्यकीय रजेवर असल्यामुळे मी उपस्थित राहू शकले नाही. तरी मी ग्‍ा्र.पं. बोरखेडी (रेल्वे) येथील चार्ज दि. ३१.०५.२०२२ रोजी प्रशासकीय बदलीने नियुक्त श्री. शिवाजी काकडे यांच्याकडे दिलेला होता. प्रथम सुनावणीला उपस्थित राहण्याची जबाबदारी विद्यमान ग्रामपंचायत अधिकारी यांची होती . सबब माहितीच्या अनुषंगाने मागितलेली माहिती सदर व्यक्तीला देण्यात आलेली आहे. "

तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे), ता.जि. नागपूर यांनी दि. ०९.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे.

" महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांचेकडील अपिल क्र. १३७९/२२ अन्वये दि. १४ नोव्हे २०२४ रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली होती. उक्त कालावधीमध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ आचार संहिता सुरु होती तसेच ५०-हिंगणा विधानसभा मतदार संघामध्ये माझी चित्र फीत

निगराणी पथक (Vedio Survellence Team) पथकामध्ये सहायक म्हणून नियुक्ती केलेल्नी असल्याने आचार संहिता कक्ष येथे निवडणूक कर्तव्य पथकामध्ये कार्यरत असल्यामुळे दि. १४ नोव्हेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठाकडील सुनावणीस प्रत्यक्ष उपस्थित राहता आलेले नाही. परंतु पंचायत सेवक श्री. गणेश पाटील यांना आवश्यक दास्तासह उपस्थित ठेवण्यात आलेले होते.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर योचे दि. ०६.११.२०२५ अन्वये आज मा. राज्य माहिती आयुक्त समक्ष हजर असुन अपिलार्थी यांनी जोडपत्र-अ अन्वये मागितलेली माहिती ग्रा.पं. बोरखेडी (रेल्वे) येथे उपलब्ध असलेली लेखा परीक्षण अहवाल अर्जदार श्री.राजेश नवलकिशोर ठाकुर रा. नागपूर यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. "

उपरोक्त खुलासाचे अवलोकन केले असता, विद्यमान व तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे), ता.जि. नागपूर यांनी आयोगास सादर केल्नेला खुलासा मान्य करण्यात येत असून, सदर विलंब क्षमापित करण्यात येत आहे. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५.०३.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहिती दि. १०.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये भारतीय डाकसेवाव्दारे पुरविण्यात आली आहे. सदर प्रकरणी निकाली काढणे संयुक्तिक ठरते.

अपिलार्थी , श्री. राजेश ठाकूर यांनी व्दितीय अपिल क्र. १३७९/२०२२ मध्ये दि. १३.०१.२०२५ रोजी निर्गमित केलेल्या अंतरिम आदेशास अनुसरुन अंतीम सुनावणी होण्याआधीच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कलम १८ अंतर्गत दि. २४.०२.२०२५ रोजी आयोगात तक्रार दाखल केली होती. त्यानुषंगाने तक्रार क्रमांक ७६/२०२५ असा क्रमांक देवून सदर तक्रार व्दितीय अपिल क्र. १३७९/२०२२ सह जोडण्यात आली होती. सबब, व्दितीय अपिल क्र. १३७९/२०२२ अंतिमत: निकाली काढत असल्यामुळे तक्रार क्रमांक ७६/२०२५ सुध्दा निकाली काढणे उचित ठरते.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतिम आदेश**

प्रस्तुत व्दितीय अपिल व तक्रार अर्ज अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**

**दिनांक : ०९.१२.२०२५**

जावक क्रमांक el -------------- दिनांक ---------- 6 JAN 2026